दैनिक महामेट्रो

डाळिंबाचा पहिला कंटेनर समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना

पान २ ▶▶



वर्ष ४ रे : अंक : ५ पुणे, रविवार, २१ डिसेंबर २०२५ पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.4. ISSUE : 5 Pune, Sunday, 21 December 2025 Pages : 4 PRICE : 3.00

# नेते तुपाशी आणि कार्यकर्ते उपाशी




## नेत्यांच्या पक्षांतरामुळे कार्यकर्त्यांचे मरण; भविष्य अंधकारमय

**पुणे दि. २० :** सध्या राजकीय पक्षात विचारसरणी , मूल्य, निष्ठा नावाला उरली नाही . त्यामुळे कोणतीही नेता व प्रमुख कार्यकर्ता मनाला वाटेल त्या पक्षात प्रवेश घेतो . किंवा त्या पक्षातून बाहेर पडतो . सध्याच्या निवडणुका या विचारसरणीवर अवलंबून नसून केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी झाल्या आहेत . त्यामुळे नेतेमंडळी मनाला वाटेल त्या पक्षात आपल्या मर्जीप्रमाणे सोयीनुसार प्रवेश घेतात . त्यामुळे ज्या नेत्यांसाठी ज्यांनी दिवस-रात्र काम केले अशा कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले जाते . या कार्यकर्त्यांनी संख्या मोठी असते . त्यामुळे ज्याच्यासाठी वेळ , श्रम व निष्ठा वाहिली त्याची परतफेड त्यांना थोड्या फार पैशाच्या रूपाने मिळते. नेत्यांनी पक्ष बदलल्यामुळे त्यांना प्रतिष्ठा किंवा पत प्रसिद्ध मिळेल याची शाश्वती नसते. कार्यकर्ते एखादी नोकरी , एखादा उद्योग व्यवसाय किंवा शाळा प्रवेश अशा माफक व किरकोळ अपेक्षा असतात. त्या पूर्ण व्हावेत म्हणून वर्षानुवर्ष नेत्यांच्या मागेपुढे करत असतात .नेता सांगेल तो ते काम करत इमाने ऐतबारपेणे करत असतात. या कामाची पोचपावती नेता देतोच असे नाही . त्यामुळे अख्खी उमेदीचे वर्ष कार्यकर्ता गमावून बसतो . त्याला भविष्यात कोणती शाश्वती वाटत नाही . त्यामुळे अख्खी एक नव्हे दोन नव्हे तीन पिढ्या या राजकारणापायी वाया गेल्या आहेत. याचे दुःख ना नेत्याला नेत्याच्या पक्षाला . प्रत्येक कार्यकर्त्याला हे नेते गृहीत धरतात आणि आपल्या मर्जीप्रमाणे त्याला वागवतात. शेकडा पाच ते दहा टक्केच कार्यकर्त्यांना चांगली संधी मिळते , मात्र 90 टक्के कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही . त्यामुळे हे कार्यकर्ते मिळेल ते काम , मिळेल ती नोकरी, मिळेल तो व्यवसाय करताना दिसतात. काही कार्यकर्ते व्यसनाधीन होतात तर काही कार्यकर्ते गुन्हेगार क्षेत्रात प्रवेश करतात. त्यामुळे त्यांचा भविष्यकाळ अंधारकरम असतो. याची परवा येथील 'जाणत्या राजाला '

### आहे ना सत्ताधा-यांना....

पुणे लोकसभा विधानसभा असो की स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये राजकीय नेते पक्षांतर करतात. त्यामुळे त्यामुळे कार्यकर्त्यांना सुद्धा नेत्याच्या पक्षांमध्ये नाईलाज असतो प्रवेश घ्यावा लागतो .यामुळे कार्यकर्त्यांची कोंडी होते .नेताच विरोधी पक्षात गेल्यावर कार्यकर्त्याला तेवढी किंमत मिळत नाही .सध्या वर्षा दोन वर्षात नेतेमंडळी पक्ष बदलतात. कार्र्यकर्याला ग्रहीत समजून त्यांना दुसरा पक्षात घेऊन जातात . पूर्वी कार्यकर्ते भेळ वडापाव वर प्रचार करीत आणि आपल्या नेत्याला निवडून देत . आत्ताचा कार्यकर्ता बिर्याणी, मटन चिकन, मद्यपान , मोटारी आदींची अरेक्षा ठेवतात . यासह एखाद्या मंडळाचे अध्यक्ष किंवा एखाद्या समाजाचा नेता असेल तर लाखो रुपयाची मागणी इच्छुक उमेदवारांकडे करतात. त्यामुळे उमेदवार सुद्धा त्याची किंमत करून त्याच्या लायकीप्रमाणे पैसे देतात आणि निवडून येतात . निवडून आल्यानंतर त्याच्याकडे बघत सुद्धा नाहीत . निवडून येण्यासाठी मी पैसे दिलेत त्यामुळे त्या कार्यकर्त्याला नेते किंमत देत नाहीत हे सुद्धा वास्तव आहे



# कारागृहात नऊशे सीसीटीव्ही कॅमेरे तरी कैद्यांमध्ये हाणामारी

## कारागृहावर लक्ष ठेवण्यासाठी खरेदी केलेल्या ड्रोनचा प्रयोग फसला ; अनेक कॅमेरे बंद

**पुणे दि. २०:** येरवडा मध्यवर्ती कारागृहासह राज्यातील सहा मध्यवर्ती कारागृहात दोन हजार ३९४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तर इतर दहा कारागृहांमध्ये तीन हजार ८२२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. तरी सुद्धा कारागृहातील मनुष्यबळ कमी असल्यामुळे कैद्यांवर नियंत्रण ठेवण्यावर मर्यादा येतात. कॅमेरे जरी असले तरी एकाद्यावेळी कैद्यांमध्ये भांडण झाले तर त्यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी मनुष्यबळ आवश्यक आहे. कारागृहातील शेकडो तुरूंग रक्षकांच्या जागा रिक्त आहेत. तर प्रत्येक कारागृहात डझनभर तुरूंगाधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याचे म्हणणे कारागृह प्रशासनाचे आहे. तर सध्या अनेक कॅमेरे बंद असल्याचे नुकतेच सुरक्षा समितीच्या पाहणीत आढळले आहेत.




### मोक्काच्या गुन्ह्यातील गुंडाची कारागृहात दहशत

शहरात गेल्या तीन ते चार वर्षांत पोलीसांना मोक्का कारवाई करुन सातशेपेक्षा जास्त गुंडांची कारागृहात रवानगी केली आहे. त्यामुळे काही प्रमाणात शहर शांत झाले असले तरी या गुंडांनी कारागृहात धुडगुस घातला आहे. त्यामुळे कारागृहात नवीन व जुने असे गट पडून टोळी युद्धांचे प्रसंग घडत आहेत.

### कारागृहातील कैद्यांवर लक्ष ठेवणा-या ड्रोन चे टेकऑफच नाही

येरवडा कारागृहातील कैद्यांवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी व आतील टोळी युद्ध व बेकायदा कृत्यावर लगाम घालण्यासाठी ड्रोन खरेदी करण्यात आले होते. मोठा गाजावाजा करून ड्रोनचे प्रात्यक्षिकेही घेण्यात आले होते. मात्र येरवड्यातील ड्रोनचे टेकऑफच झाले नाही. याबाबत हवाई दलाची परवानगी घ्यावी लागणार असल्याचे कारागृह प्रशासनाने सांगितले.

येरवड्यासह राज्यातील कारागृहात टोळी युद्धाच्या घटना घडतात. कारागृहातील कैदी संख्येचा विचार करता अनेक वेळा कारागृहात हाणामारीच्या घटना घडतात. तरी कधी मोबाईल सापडतात तर कधी अंमली पदार्थ सापडण्याच्या घटना घडतच असतात. त्यामुळे कारागृहातील कैद्यांवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन खरेदी करण्यात आले होते. या ड्रोनचे प्रात्यक्षिक सुद्धा झाले होते. प्रायोगिक तत्वावर येरवडा मध्यवर्ती कारागृहावर ड्रोन ची नजर ठेवण्यात येणार होते. मात्र, ड्रोन ने टेकऑफ घेतलेच नाही.

येरवडा मध्यवर्ती कारागृहाचा परिसर ६५ एकरांचा आहे. या संपुर्ण परिसरावर ड्रोनची गस्त महत्वाची ठरणार होती. कैद्यांच्या भांडणावर नियंत्रण व इतर बेकायदाकृत्याव निर्बंध घालण्यात येणार होते. मात्र,ड्रोन उडविण्यासाठी हवाई दलाची परवानगीची आवश्यकता होती. मात्र, त्याबाबत पाठपुरावा कारागृह प्रशासनाने केले नाही. राज्यातील कारागृहांपैकी येरवडा कारागृहात ड्रोन कॅमे-याची गस्त हा प्रायोगिक प्रकल्प होता. मात्र ड्रोन खरेदी करून उपयोग नाही. यासाठी ड्रोन चालविण्याचे तंत्र त्यानंतर ड्रोनची देखभाल व दुरूस्ती करणारे मनुष्यबळ कारागृहाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे कारागृह प्रशासनाचा ड्रोनचा प्रायोगिक प्रकल्पच फसला आहे.

### सीसीटीव्हीचा तीन महिने बॅकअप

राज्यातील कारागृहात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमे-यांची एकुण किंमत २३ कोटी रूपये होते. दुस-या टप्प्यातील कॅमे-यांची किंमत ६७ कोटी रूपये आहे. कॅमे-यांचा बॅकअप तीन महिन्यांचा आहे. तर कॅमेरे ज्या संस्थेने बसविले आहेत ती संस्था पुढील पाच वर्ष सर्व कॅमे-यांची देखभाल व दुरूस्ती करणार असली तरी अनेक कॅमेरे बंद पडले आहे. त्यामुळे कॅमे-यांची सोय कोणासाठी असा प्रश्न पडतो.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपा आमने सामने

## लोहगाव- धानोरीला मिळणार प्रतिनिधित्व पण 'कळस' चे काय मतदारांचा सवाल

एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणारा प्रभाग एक आता भाजपच्या ताब्यात आला होता. आता हे समिकरण बदलणार का ? येथील मतदार कोणाच्या पारड्यात मत टाकणार हे लवकरच कळणार आहे.

गेल्या महापालिका निवडणुकीत भाजपाचे तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक नगरसेविका विजयी झाली होती. कळस विश्रांतवाडी धानोरी पर्यंतचा असणारा एकचा प्रभाग आता लोहगाव पर्यंत विस्ताराला आहे.यंदाच्या निवडणुकीत भाजपने चारही जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. दुसरीकडे माजी आमदार सुनील टिंगरे यांनी प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विजयी करण्यासाठी पुढे सरसावले आहे.त्यामुळे एक मध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशी सरळ लढत होणार आहे.

### प्रभागाचा लेखा- जोखा
### धानोरी- विश्रांतवाडी - कळस

सन २०१७ साली झालेल्या पालिका निवडणुकीत प्रभाग एक मधून भाजपाचे किरण नीलेश जठार , मारुती (नाना) सांगडे आणि अनिल (बॉबी) वसंतराव टिंगरे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रेखा चंद्रकांत टिंगरे विजयी झाले होते. यंदाच्या निवडणुकीत प्रभागात कळस विश्रांतवाडी धानोरी मध्ये लोहगावचा समावेश झाल्याने मतदारांची संख्या एक लाख पाच हजारापर्यंत गेली आहे.

बनावट दाखला सादर केल्याप्रकरणी भाजपच्या नगरसेविका किरण जठार यांचे पद रद्द झाले.त्यामुळे प्रभागात अडीच वर्षात पोटनिवडणूक करावी लागली. काँग्रेस मधून भाजपात आलेल्या ऐश्वर्या जाधव यांना पक्षाने उमेदवारी दिली आणि जाधव पोट निवडणुकीत विजयी झाल्या. भाजपा कडून अनिल टिंगरे विजयाची हॅट्रिक सोबत संपूर्ण पॅनल विजयी करण्याचा निर्धार केला आहे.मात्र अनिल टिंगरे यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शशिकांत टिंगरे असणार आहे. त्यामुळे टिंगरे भावकी मध्ये जोरदार लढाई रंगणार असून कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण प्रभागाचे लक्ष लागणार आहे.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांनी विजयाचा चौकार करण्यासाठी अथक परिश्रम सुरू केले आहे. त्यांच्या राष्ट्रवादी पक्षातील प्रवेशामुळे राष्ट्रवादी पॅनल भक्कम स्थितीत आहे. मात्र यंदाच्या निवडणुकीत रेखा टिंगरे यांच्या समोर भाजपाच्या इच्छुक उमेदवार पूजा जाधव आणि वंदना खांदवे यांनी तगडे प्रतिस्पर्धी उमेदवार उभे ठाकले आहे. प्रभागातून सलग तीन वर्ष विजयी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका रेखा टिंगरे यांच्या समोर यंदा भाजपाचे संभाव्य उमेदवार पूजा जाधव आणि वंदना खांदवे यांनी मोठे आव्हान निर्माण केले आहे. मात्र त्यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेशामुळे सर्व समीकरणे बदलणार आहेत. भाजपने यंदा चारही जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे.

ओबीसी गटातून भाजपकडून उमेदवारी मिळविण्यासाठी पूजा जाधव आणि वंदना खांदवे यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू आहे.वंदना खांदवे यांचे पती संतोष (लाला ) खांदवे हे भाजपाचे जुने एकनिष्ठ नेते म्हणून ओळखले जात असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चांगले संबंध आहेत.दुसरीकडे पूजा जाधव यांनी मागील काही महिन्यात प्रभागात जोरदार वातावरण निर्मिती तयार केल्याने उमेदवारी मिळण्याच्या आशेवर आहेत.

भाजपकडून उमेदवारी न मिळाल्यास खांदवे आणि जाधव तुतारी किंवा घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवार रिंगणात उतरणार आहे.शिवसेना शिंदे गटाकडून गिरीष जैवळ उमेदवारीसाठी प्रयत्न करत आहेत.

### भाजपकडून इच्छुक उमेदवार..

**अनुसूचित जाती :** ऐश्वर्या जाधव , मीना माने ( इंगुळकर),ॲड सुरेखा भोसले,रूपाली राखपसरे, सुरेखा राखपसरे,वैशाली जगताप
**अनुसूचित जमाती (सर्वसाधारण):** संगीता दांगट,
**ओबीसी :** वंदना खांदवे,पूजा जाधव,मोनिका परांडे
**खुला :** अनिल टिंगरे,

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

**अनुसुचित जाती :** आरती चव्हाण, सुजाता माने,मोनाली भोसले,
**अनुसूचित जमाती :** प्रदीप रावते
**ओबीसी :** मीनाक्षी म्हस्के,
**खुला :** शशिकांत टिंगरे,सतीश म्हस्के,कुलदीप शर्मा, गणेश टिंगरे.

### प्रभागातील प्रमुख समस्या..

१.अनेक वर्षांपासून धानोरी आणि लोहगाव मधील अनेक डिपी रस्ते रखडलेत.
२.त्यामुळे धानोरी लोहगाव या एकमेव रस्त्यावर वर्षानुवर्ष नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.
३.लोहगाव करांना मुबलक पाणी मिळत नसल्याने दर महिन्याला लाखो रुपयांचा भुर्दंड.
३.विकास आराखडा मंजूर नसल्याने लोहगाव मध्ये प्रचंड बेकायदा बांधकामे.

## संपादकीय....

# नागरी संरक्षण दलाची तीन हजार चौ.मी. भूखंड वाचला

पर्वती, सिटी सर्व्हे नंबर २३० येथील अतिशय मोक्याची नागरी संरक्षण दलाची तब्बल तीन हजार चौ.मी. भूखंड सरकारी जमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले होते. या जागेचा गेली दहा वर्षांपासून वापरच होत नसल्याचा खोटा अहवाल पुणे शहर तहसिलदारांनी तयार केला होता. याठिकाणी नागरी संरक्षण दलाचा केंद्र सरकारच्या धर्तीवर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल ( NDRF) प्रमाणे राज्य आपत्ती निवारण दल ( SDRF) तयार करण्याचा प्रस्ताव आहे. ही जागा कोणाच्या तरी घशात घालण्याचा प्रयत्न होता. मात्र, गेल्या वर्षी १७ नोव्हेंबर २०२३ 'नागरी संरक्षण दलाची जागा हडपण्याचा प्रयत्न' या शिर्षकाखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर राज्य सरकारच्या महसूल विभागाने त्याला स्थगिती देऊन ही जागा नागरी संरक्षण विभागाच्याच ताब्यात ठेवले आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने १२ ऑगस्ट १९६४ मध्ये मौजे पर्वती येथील सात एकर जागा नागरी संरक्षण दलाला नियंत्रण कक्ष व प्रशिक्षण केंद्रासाठी दिली होती. नागरी संरक्षण दल स्वयंसेवकांचे सराव, प्रशिक्षण व नियंत्रण कक्षासाठी वापरत आहे. पुणे हे लोकसंख्येच्या बाबतीत अत्यंत वेगाने वाढणारे शहर आहे. गृह विभाग नागरी संरक्षण दलासाठी विविध प्रशिक्षणासाठी जागा कमी पडत आहे. तसेच युद्धजन्य परिस्थितीत, नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती दरम्यान नागरीकांना बचाव करण्यासाठी पर्वती येथील मध्यवर्ती जागेचा वापर होऊ शकतो. या ठिकाणी पाण्याची भूमिगत टाकी असून युद्ध काळात या पाण्याचा वापर केला जातो.

भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून भारतीय संरक्षण प्रबोधिनी( NDA), दक्षिण कमांड, हवाई दलाचे तांत्रिक बेस स्टेशन, खडकी येथील दारुगोळा कारखाना, पुणे शहराला पाणीपुरवठा करणारी पानशेत, वरसगाव, खडकवासला, मुळशी ही धरणे आहेत. पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातून मुळा व मुठा या महत्त्वाच्या नद्या वाहतात. दरवर्षी या नद्यांना पूर आल्यावर नागरिकांना स्थलांतर करण्यासाठी पर्वती व येरवडा उपनियंत्रण येथे पावसाळी पूरजन्य परीस्थितीमध्ये बाधित नागरीकांसाठी निवारा केंद्रासाठी जागेचा वापर केला जातो. पर्वती येथील नागरी संरक्षण दलाच्या जागेवर हजारो स्वयंसेवक प्रशिक्षित करण्यात आले आहे.

गेली अनेक वर्षे या ठिकाणी नागरी संरक्षण दलाचे प्रशिक्षण सुरू आहेत. मात्र, पुणे शहर तहसिलदारांनी या जागेचा वापर गेली दहा वर्षांपासून होत नसल्याच खोटा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला दिला होता. त्यामुळे येथील जागा ताब्यात घेण्याच्या हालचाली वेगाने सुरू होत्या. कोणाच्या मर्जीने, कोणाच्या घशात हा भूखंड टाकण्यात येत असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र, 'सीविक मिरर' मध्ये पर्वती येथील नागरी संरक्षण दलाची जागा हडपण्याचा प्रयत्न या शिर्षकाखाली बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर सर्व चक्रे फिरली. त्यानंतर राज्याच्या महसूल विभागाने ही जागा नागरी संरक्षण दलाच्या ताब्यात ठेवण्याचे जैसे थे आदेश दिले.

### राज्य आपत्ती निवारण दलासाठी पर्वती येथील जागेची निवड

पर्वती येथील नागरी संरक्षण दलाची जागा राज्य आपत्ती निवारण दलासाठी निवड केली आहे.यासह याठिकाणी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनासाठी उपकेंद्र निर्माण करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव आहे. मात्र, ही जागाच हडपण्याच प्रयत्न सुरू होता. ही सरकार हक्काची जागा कवडी मोल किंमतीत लाटण्याचा प्रयत्न होता. मात्र, ही जागा आता नागरी संरक्षण दलाकडेच राहणार आहे.



दिलीप कु-हाडे

# ब्रिटीशकालीन बंगले होणार कालबाह्य

## 'पीडब्ल्यूडी' पाडणार विमानतळ रस्त्यावरील सव्वाशे वर्षांपूर्वीचे सोळा बंगले

येरवड्यातील विमानतळ रस्त्यावर शंभर ते सव्वाशे वर्षांपूर्वीचे सोळा ब्रिटीशकालीन बंगले आहेत. या बंगल्यांमध्ये पूर्वी ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वास्तव्य होते. हे बंगले गतवैभवाची साक्ष देत आहेत. प्रत्येक बंगले वास्तुस्थापत्याचा नमुनाच आहे. यामध्ये प्रशस्त खोल्या, दगड व लाकडापासून केलेले बांधकाम आहे. सर्व खोल्यांमध्ये हवा खेळती असल्यामुळे ऐन उन्हाळयांतही थंड वातावरण राहते. बंगल्यांभोवती मोकळी जागा आहे. या बंगल्यात अनेक सरकारी कार्यालये थाटली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने ( पीडब्ल्यूडी) वेळोवेळी देखभाल आणि दुरूस्तीमुळे हे बंगल्यांना नवीन झळाळी मिळाली होती. मात्र, 'पीडब्ल्यूडी' आता पुरातत्त्वदृष्टीने महत्त्वाचे बंगले पाडून याठिकाणी फौजदारी न्यायालय, सेंट्रल बिल्डींग क्रमांक -२, जमाबंदी आयुक्त कार्यालय व जमाबंदी आयुक्तांचा बंगला यासह 'पीएमआरडीए' या ठिकाणी २५ लाख चौरस फुटाचे मेट्रो मॉल बांधणार आहे. त्यामुळे हे सर्व बंगले कालबाह्य होणार आहेत. नगर रस्त्यावरील गुंजन चौक ते येरवडा टपाल कार्यालयाच्या दरम्यान ब्रिटीशकालीन सोळा बंगले आजही इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. या सर्व बंगल्यात ब्रिटीश अधिकारी राहत होते. त्यामुळे प्रशस्त बंगले, मोठ्या खोल्या, लाकडी जीने, बंगल्या भोवती उद्यान, कारंजे, प्रशस्त प्रवेशव्दार पाहण्यास मिळते. अशा या सोळ्या बंगल्यात राज्य सरकारची विविध कार्यालये आज थाटलेली दिसत असली तरी काही दिवसात हे बंगले कालबाह्य होणार आहेत. अशा बंगल्यांचा घेतलेला आढावा. पहिल्या क्रमाकांच्या बंगल्यात हवेली तालुक्याचे भूमि



अभिलेख कार्यालय आहे. दोन व तीन क्रमाकांच्या बंगल्यात सिंचन भवनचे कार्यालय आहे. या बंगल्याचे प्रवेशव्दार आकर्षक आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेते. विभागीय जिल्हा उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक व पुरातत्त्व विभागाचे कार्यालय बंगला क्रमांक चार मध्ये आहे. बंगला क्रमांक चार पाडून या ठिकाणी फौजदारी न्यायालय उभारण्यात येणार आहे. पाच क्रमाकांच्या बंगल्यात जिल्हा भूमि अभिलेख व जिल्हा हिवताप नियंत्रण कार्यालय आहे. याठिकाणी २५ लाख चौरस फुटाचे 'पीएमआरडी' मेट्रो मॉल उभारणार आहे. भूमि अभिलेख विभागाने बंगला क्रमांक एक व पाचचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे. येथे सर्व प्रकारचे जागेचे उतारे, सात बारा संगणीकृत पद्धतीने जतन करून ठेवलेले आहेत.

अभिलेख तत्काळ मिळावेत म्हणून आधुनिक पद्धतीने कपाटांमध्ये सुरक्षित ठेवले आहेत. मात्र, त्यांना सुद्धा हा बंगला सोडावा लागणार आहे. त्यानंतर त्यांचे स्थलांतर सेंट्रल बिल्डिंग क्रमांक दोन मध्ये होणार आहे. पुणे शहर वाहतूक विभागाचे कार्यालय बंगला क्रमांक सहामध्ये आहे. या कार्यालयाची दुरुस्ती केली असली तरी याठिकाणी जमाबंदी आयुक्तांचे कार्यालय व बंगला होणार आहे. बंगला क्रमांक सात मध्ये सिंचन कार्यालय तर बंगला क्रमांक आठमध्ये विद्युत निरीक्षक व सांख्यिकी कार्यालय आहे. नऊ क्रमाकाचा बंगला येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या ताब्यात आहे. विक्रीकर भवनची इमारत बांधण्यासाठी बंगला क्रमांक दहा व तेरा तोडले आहेत. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय व नगररचना कार्यालयासाठी बंगला क्रमांक अकरा देण्यात आला आहे. तर बारामध्ये स्थानिक सिंचन भवनचे कार्यालय आहे. बंगला क्रमांक चौदामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे भूमि अभिलेख कार्यालय आहे. तर गुंजन चौका समोर बंगला क्रमांक पंधरा मध्ये हवेली सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. भीमाशंकर सरकारी कर्मचारी वसाहतीच्या आवारात असलेल्या बंगला क्रमांक सोळामध्ये उपनियंत्रक वैधमापन शास्त्र विभागाचने कार्यालय थाटले आहे. ही सर्व कार्यालय आता लवकरच इतिहास जमा होणार आहेत. बंगल्यांना झळाळी सरकारी कार्यालय म्हटले की तेथे नागरिकांची मोठया प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी या सोळा बंगल्यांची देखभाल व दुरूस्ती केल्यामुळे त्याला झळाळी मिळाली होती. हे सर्व बंगले पुरातत्त्व दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असून ब्रिटीशकालीन वास्तुशास्त्राचा सुंदर नमुना पाहण्यास मिळतात. शंभर ते सव्वाशे वर्षांनंतरही हे सर्व बंगले मजबुत आहेत.




नव्या नवलाईने २०२६ नूतन वर्ष लवकरच सुरू होत आहे.विद्यार्थी, गृहिणी, तरुण तरुणी,नोकरदार, जेष्ठ नागरिक ,समाज घटकांतील प्रत्येक जण नव्या वर्षाच्या स्वागतासाठी उत्सुक असतोच.प्रत्येकजण आपापल्या परीने नवीन वर्षाच्या काही योजना मनातल्या मनात आखत असतोच.नवीन उत्साह भरलेला असतो.विद्यार्थीवर्गाचे नवीन वर्ष तसे म्हणायला गेले तर जून मध्ये सुरू होते ; तर पगारदार मंडळींचे नवे वर्ष १ एप्रिल मध्ये सुरू होते.गृहिणींना गुढीपाडवा वर्षाची सुरवात वाटते ; तर व्यापारी वर्ग दिवाळीच्या पाडव्याला नव्या वर्षाची सुरवात करतात. पेन्शनर नोव्हेंबर मध्ये हयातीचा दाखला बँकेमध्ये सादर करून नवीन वर्षात पेन्शन मिळविण्याचा मार्ग मोकळा करतात.शेतकरी राजा मृगाचा पाऊस पडल्यावर पेरणीसाठी सज्ज होतात तेव्हा ते नवीन वर्षात पदार्पण करतात.प्रत्येक जण मग ते कोणत्याही जाती धर्माचे असोत वर्षभरात अनेक नववर्ष साजरे करीत असतात. प्रत्येकाचे संकल्प वेगवेगळे.

नवीन म्हटले की उत्साह संचारतोच.नवीन या शब्दातच उत्साह भरलेला आहे.नवे कपडे,नवे मित्र,नवीन खाद्यपदार्थ, नवे वाहन,नवा ऋतू,नवी खरेदी, नवीन चित्रपट अशा सर्वच नव्या गोष्टी प्रत्येकाला भावतातच.नव्याची नवलाई हा शब्दप्रयोग त्यामुळेच आला असावा.अर्थात ' नव्याची नवलाई' ही नऊच दिवस टिकते हेही तितकेच खरे.मानवाचा इतिहास पाहिला तर अगदी आदिमानवापासून ते आजच्या अति प्रगत आधुनिक माणसापर्यंत प्रत्येकाला या नव्याची आस आहे.जीवन एकसुरी होऊ नये यासाठीच नवकल्पना लढविल्या जातात.माणसाला सतत एकच गोष्ट सारखी सारखी करण्यात कंटाळा येतो.नवे काही करायचे म्हटल्यावर त्याच्या अंगात उत्साह संचारतो. प्रत्येक नव्या गोष्टीसाठी आपण आतुर होतो.प्रत्येक जण आपापल्या परीने नव्या गोष्टी साजऱ्या करतो.

लवकरच आपले सर्वांचे नवे वर्ष सुरू होत आहे. या नवीन वर्षात आपण नवे काही शिकूया. एखादी कला,एखादा क्रीडाप्रकार, नवे वाचन, लेखन शिकता येईल. नवी ठिकाणे पाहता येतील. नवे मित्र जोडता येतील.एखाद्या सामाजिक प्रश्नाचा अभ्यास करून समाजासाठी फुल ना फुलांची पाकळी या नात्याने सहभागी होता येईल. वेगवेगळ्या विषयांवरील व्याख्याने ऐकता येतील. अनेक नव्या गोष्टी आपणांस खुणावत आहेत.चला तर मग या नवीनवर्षात नवे काही शिकण्याचा संकल्प करूयात.आणि हो ' नव्याची नवलाई नऊ दिवस ' टिकते या उक्तीप्रमाणे नको तर वर्षभरच हा नव उपक्रम सुरू ठेवूया.तुम्हा सर्वांना येणाऱ्या नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

**- श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,**
**( निवृत्त कलाशिक्षक ) पुणे - ४११०२१.**
**मो नं.-९८६०५८६१४७.**



# कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर....

कोल्हापूर म्हटले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे उमदे व्यक्तिमत्व डोळ्यापुढे येते. श्री अंबाबाई, श्री जोतिबा, गड, किल्ले, जंगल, घाट, वने, धरणे, तांबडा-पांढरा आणि येथील खाद्य संस्कृती डोळ्यापुढे येते. मात्र, आता हे शहर लवकरच आणखी एका वेगळ्या वैशिष्ट्यासाठी ओळखले जाणार आहे.ते म्हणजे कोल्हापूरची चित्रनगरी. राज्य शासनाने मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटी, हैदराबादच्या रामोजी फिल्मसिटी प्रमाणेच कोल्हापूरच्या चित्रनगरीचा विकास करण्याचे निश्चित केले असून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी विकास कार्य हाती घेतले आहे.

कोल्हापूरची चित्रनगरी नव्या जोमाने, नव्या रूपात, नव्या दमात उभी राहत आहे.कोल्हापूर आणि चित्रपट निर्मिती याचे नाते तसेच जुनेच आहे. इथल्या मातीत चित्रपट प्रेम रुजले आहे.शाहू महाराजांसारख्या कलासक्त माणसाच्या मशागतीत तयार झालेल्या या शहराने चित्रपटाशी आपले नाते कायम ठेवले आहे. शहराचे नाव इथल्या मातीत रुजलेल्या चित्रपट प्रेमामुळेही खास आहे. दिग्दर्शक, निर्माते, लेखक, तंत्रज्ञ यांच्यासाठी कोल्हापूर ही केवळ एक जागा नसून, एक "शाळा" आहे, असे वक्तव्य नुकतेच ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी राजर्षी शाहू महाराज जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना केले.त्यांच्या या विधानातून कोल्हापूरच्या चित्रसांस्कृतिक वारशाचा गौरव अधोरेखित होतो.

कोल्हापूरने भारतीय चित्रपटसृष्टीला भालजी पेंढारकर,राजा परांजपे, बाबुराव पेंटर, व्ही. शांताराम,अरुण सरनाईक, बाळकृष्ण नरके,चंद्रकांत, सूर्यकांत मांढरे, मास्तर विनायक, बाबुराव पेंढारकर, अनंत माने, सुलोचना, आशा काळे, उषा नाईक अशा कितीतरी दिग्गजांची देणगी दिली आहे. दादा कोंडके,लता मंगेशकर आणि मंगेशकर भगिनी, राजदत्त यांच्यासह दिग्गज संगीतकार,संगीतसूर्य केशवराव भोसले अशा कितीतरी नावांनी कोल्हापूरचे नाव सिने - नाटय क्षेत्रामध्ये अजरामर केले आहे. अनेक कलाकारांसाठी त्यांच्या आयुष्यात कोल्हापूर हे कलाक्षेत्राचे उगम स्थान ठरले आहे. यामध्ये प्रभात फिल्म कंपनीचा नामोल्लेख आवश्यक ठरतो. कोल्हापूरने शालीनी सिनेटोन, जयप्रभा स्टुडीओचाही एक सुवर्ण काळ अनुभवला आहे.चित्रपट कसा तयार करायचा हे तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी चेन्नईपासून कराची पर्यंतची अनेक मंडळी पूर्वीच्या काळी कोल्हापूरला येत असत.गांधी पिक्चर साठी पहिले ऑस्कर मिळवलेल्या भानु आथय्या मूळच्या कोल्हापूरच्या. ग.दि. माडगूळकर, सुधीर फडके यांची कारकीर्दही कोल्हापुरातून सुरू झाली. एवढेच काय पृथ्वीराज कपूर, राज कपूर यांनीही भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. त्यामुळे कोल्हापूरचे नाव चित्रपटांपासून वेगळे करता येत नाही.

याच चित्रप्रेमाला सन्मान देताना महाराष्ट्र शासनाने कोल्हापूरमध्ये १९८५ मध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची स्थापना केली. करवीर तालुक्यातील मोरेवाडी येथील ७८ एकर जागेत ही चित्रनगरी उभारण्यात आली. मात्र, मधल्या काळात ही संस्था तोट्यात गेल्याने बंद करण्याचा निर्णयही घेतला गेला. पण कोल्हापूरकरांच्या मागणीला दाद देत शासनाने २००८ मध्ये पुन्हा चित्रनगरी पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेतला. आता मात्र कोल्हापूरची चित्रनगरी नफ्यामध्ये घोडदौड करत आहे. या चित्रनगरीला आता वेध लागले आहे, मोठ्या बिग बजेट निर्मितीच्या कार्याचे.

- प्रवीण टाके,
उपसंचालक (माहिती)
कोल्हापूर विभागीय कार्यालय
कोल्हापूर

# शिवरायांचे दुर्गवैभव आता जागतिक ठेवा!

छत्रपती शिवाजी महाराजांनी बारा मावळ मध्ये उभारलेले गड-किल्ले हे महाराष्ट्राच्या आत्म्याचे रूप आहेत. आता हे गड फक्त आपलेच नाहीत, तर संपूर्ण जगाचे झाले आहेत. युनेस्कोने ११ जुलै २०२५ रोजी महाराजांचे महाराष्ट्रातील ११ दुर्ग आणि एक दक्षिणेतील जिंजीचा किल्ला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आणि शिवरायांचे स्वराज्य – जागतिक नकाशावर अधोरेखित झाले. या ऐतिहासिक मान्यतेमागे अनेकांची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला पाठिंबा आणि केंद्र सरकारकडून सक्रिय सहभाग ही अत्यंत मोलाची बाब ठरली. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि संस्कृती मंत्रालयाने यात मोठी मदत केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही वेळोवेळी मुख्यमंत्र्यांना साथ दिली. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्वत: जाऊन युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेतली. तेथे तांत्रिक सादरीकरण केले. मुख्यमंत्री कार्यालयातील अपर मुख्य सचिव विकास खारगे, तसेच भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी त्यात सहभागी होते. अनेकांचे हातभार लागले आणि त्यातून देशभरातील शिवभक्तांसाठी आजचा आनंदाचा क्षण साकारला गेला. त्या निमित्ताने या बारा किल्यांचे महत्त्व अधोरेखित केलेला हा संकलित लेख आपल्यासाठी...!!

हे फक्त किल्ले नाहीत... ते आहे आपल्या अस्मितेचं जिवंत रूप! शिवरायांचे हे किल्ले म्हणजे इतिहासाचे सजीव संग्रहालय आहेत. इथल्या प्रत्येक दगडात स्वराज्याची ठिणगी साठलेली आहे. चला तर, पाहूया या बारा दुर्गांची शौर्यगाथा – प्रत्येकाची वेगळी ओळख आणि शिवरायांच्या जीवनाशी नाळ जुळलेली!

रायगड हा छत्रपती शिवाजी महाराजांचा राजधानी किल्ला होता. इथेच १६७४ साली त्यांचा राज्याभिषेक झाला आणि मराठा साम्राज्याची औपचारिक सुरुवात झाली. रायगड हा राजकारण, प्रशासन आणि सैन्य संचालनाचे केंद्र होता. दुर्गम, मजबूत आणि नैसर्गिक संरक्षण असलेला हा किल्ला शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्वप्नाचा प्रतिबिंब मानला जातो. रायगड म्हणजे मराठ्यांच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि स्वराज्याच्या गौरवाचे प्रतीक आहे. १६७४ मध्ये शिवरायांचा राज्याभिषेक याच गडावर झाला. महाराजांनी याला 'राज्यगड'चं रूप दिलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच किल्यावर आपला देह ठेवला. त्यांची समाधी ही मराठी माणसांच्या अपार श्रद्धेचं ठिकाण आहे. रायगड म्हणजे स्वराज्याची मूर्तिपूजा.

राजगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा पाया मानला जातो. याचे जुने नाव मुरुंबदेव होते. इ.स. १६४६ साली शिवाजी महाराजांनी राजगड किल्ला जिंकून घेतला आणि यालाच आपल्या स्वराज्याची पहिली राजधानी बनवली. जवळपास २६ वर्षे हा किल्ला राजधानी राहिला. इथेच महाराजांच्या पत्नी सईबाई यांचे निधन झाले, आणि पुत्र संभाजी यांचे बालपणही याच किल्ल्यावर गेले. अफजलखान वधानंतर महाराज थेट राजगडावरच परतले होते. राजगड हा भक्कम, विशाल आणि रणनीतीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा किल्ला होता.

प्रतापगड किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा आणि राजकीय चातुर्याचा जिवंत स्मारक आहे. सातारा जिल्ह्यात, महाबळेश्वरपासून जवळ असलेला हा किल्ला १६५६ साली महाराजांनी बांधला. याच किल्ल्यावर १६५९ साली अफझलखानाशी ऐतिहासिक युद्ध झाले. अफझलखानाचा पराभव हा स्वराज्यासाठी एक मोठा विजय होता. ही लढाई केवळ तलवारीची नव्हती, ती नियोजनाची, रणनीतीची आणि दृढ इच्छाशक्तीची होती. प्रतापगडावरून शिवरायांनी पहिल्यांदाच आपल्या युद्धनीतीची प्रभावी चुणूक दाखवली. यामुळेच प्रतापगड आजही "शौर्य आणि चातुर्याची रणभूमी" म्हणून ओळखला जातो. इथेच अफजलखानाच्या भेटीने इतिहास घडवला. महाराजांनी शौर्य, राजनैतिक डावपेच आणि प्रसंगावधान याचा संगम दाखवून दिला.



पन्हाळा किल्ला हा कोल्हापूर जिल्ह्यातील एक भव्य आणि ऐतिहासिक किल्ला आहे. याचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील एका अत्यंत थरारक घटनेमुळे अधिक वाढते – ती म्हणजे पावनखिंडीची लढाई. इ.स. १६६० मध्ये सिद्दी जोहरच्या वेढ्यात अडकलेल्या शिवाजी महाराजांनी गुप्त मार्गाने पन्हाळ्याहून विशाळगडाकडे प्रयाण केले. त्यावेळी बाजीप्रभु देशपांडे आणि काही मावळ्यांनी सिद्धीच्या सैन्याला रोखण्यासाठी घाटमाथ्यावर पावनखिंडीत प्राणांची आहुती दिली. बाजीप्रभूंची ही शौर्यगाथा इतिहासातील एक अमर पर्व ठरली. पन्हाळा किल्ल्यावर अंधारबाव, अंबरखाना, धान्यकोठी, सर्जा-राजा बुरूज यांसारखी स्थापत्यवैशिष्ट्ये आहेत. हा किल्ला काही काळ मराठ्यांच्या राजधानीसुद्धा होता.

शिवनेरी हा किल्ला पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळ आहे आणि तो छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मस्थान म्हणून अत्यंत पवित्र मानला जातो. इ.स. १९ फेब्रुवारी १६३० रोजी याच गडावर जिजाबाईंनी शिवरायांना जन्म दिला. हा किल्ला निसर्गरम्य, मजबूत तटबंदीने सजलेला असून आजही त्या ऐतिहासिक जन्मकक्षाचे दर्शन घेता येते. गडावरील जिजामाता व बाल शिवरायांचा संगमरवरी पुतळा, तसेच "शिवकुंज" हा परिसर पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. शिवनेरी हे शिवरायांच्या शौर्य, संस्कार आणि स्वराज्याच्या बीजारोपणाचे प्रतीक मानले जाते.

मावळ भागातील सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेला लोहगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात एक महत्त्वाचा संरक्षणकिल्ला होता. पुणे जिल्ह्यात लोणावळ्याजवळ स्थित असलेला हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ३,४५० फूट उंचीवर आहे. लोहगड किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या चारही दिशांनी असलेली खोल दऱ्या आणि त्याच्या उत्तरेकडील 'विंचूकाटा' हे नैसर्गिक रक्षण असलेले टोक. प्राचीन काळी हा किल्ला भोर घाटामार्गे चालणाऱ्या व्यापार मार्गांचे संरक्षण करीत असे. त्यामुळेच याला "व्यापार मार्गांचा रक्षक" असे म्हटले जाते.

साल्हेर किल्ला हा महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यात वसलेला एक अतिशय महत्त्वाचा दुर्ग आहे. तो समुद्रसपाटीपासून सुमारे ५,२०० फूट उंचीवर असून सह्याद्रीतील सर्वांत उंच किल्ल्यांपैकी एक आहे. १६७२ साली झालेल्या साल्हेरच्या युद्धात, मराठ्यांनी मोगल सैन्याचा पराभव केला होता. हे युद्ध इतकं थोर होतं की, हजारो सैन्याच्या लढाया, घोडदळ, हत्ती, तोफा यांचा वापर झाला आणि अखेर शिवाजी महाराजांच्या सेनापतींच्या कुशल नेतृत्वाखाली मराठ्यांनी विजय मिळवला.

सिंधुदुर्ग हा छत्रपती शिवाजी महाराजांनी अरबी समुद्राच्या लाटांवर बांधलेला अजेय जलदुर्ग आहे. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील मालवणजवळ तो वसलेला आहे. इ.स. १६६४ मध्ये महाराजांनी हा किल्ला बांधण्यास सुरुवात केली. समुद्राच्या मध्यभागी खोल पाण्यात हा किल्ला उभारण्यात आला असून तो स्वराज्याच्या सागरी संरक्षणाचे प्रतीक आहे.

विजयदुर्ग किल्ला हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडजवळ, अरबी समुद्रकिनारी वसलेला एक अत्यंत भक्कम आणि ऐतिहासिक सागरी किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुमारे १० वर्षे येथे नौदल उभारणीसाठी काम केले. हा किल्ला त्यांच्या नौदल सामर्थ्याचा केंद्रबिंदू होता. शत्रूच्या जहाजांना न दिसणारी अदृश्य सागरी चढाईमार्ग ही येथील खासियत होती.

सुवर्णदुर्ग किल्ला महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात, दापोली तालुक्यातील हर्णे बंदराच्या समोर सागरात वसलेला एक भव्य सागरी दुर्ग आहे. शिवाजी महाराजांनी इ.स. १६६० च्या सुमारास हा किल्ला सिध्दींच्या ताब्यातून काबीज केला आणि त्याची सागरी संरक्षण दृष्टीने पुनर्बांधणी करून मजबूत केला.

खांदेरी किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण! सुमारे १६७९ साली अरबी समुद्रातील या बेटावर महाराजांनी खांदेरी किल्ल्याची उभारणी सुरू केली. याचे उद्दिष्ट मुंबई बंदरावर नजर ठेवणे आणि स्वराज्याचा सागरी संरक्षण मजबूत करणे हे होते. इंग्रज व सिद्दी विरुद्ध मराठा नौदलाच्या संघर्षात खांदेरीने निर्णायक भूमिका बजावली.

जिंजी किल्ला म्हणजेच "दक्षिणेचा जिब्राल्टर" असा ओळखला जाणारा हा किल्ला तामिळनाडूमधील विलुप्पुरम जिल्ह्यात आहे. शिवाजी महाराजांचे पुत्र राजाराम महाराज मुघलांपासून बचाव करत दक्षिणेकडे गेले, तेव्हा व्यंकोजी भोसले यांची मदत आणि पाठिंबा मिळाला. त्यांनी जिंजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात येण्यासाठी मदत केली. हा किल्ला तीन टेकड्यांवर विस्तारलेला असून त्याच्या परिसराला १३ किमीचा परिघ आहे.

या किल्ल्यांना युनेस्कोची मान्यता मिळाल्याने त्यांचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटन मूल्यमापन वाढेल, जागतिक संवर्धन निधी आणि तांत्रिक मदत मिळेल, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, युवा पिढीपर्यंत स्वराज्याची खरी जाणीव पोहोचेल. हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात युनेस्कोच्या अधिकारी वर्गासोबतच भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय, पुरातत्व विभाग, आणि महाराष्ट्र शासन यांचेही मोठे योगदान आहे. हे केवळ 'वारसा' म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय अभिमान म्हणून जपले जाईल. हा इतिहास आता आपल्या बरोबर जगाचाही असणार आहे. शिवकाल फक्त आठवणीत नको, तो अनुभवात यायला हवा... आणि आता तो अनुभवण्यासाठी जगातून लोक महाराष्ट्रात येतील!

**संकलन : युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

**दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५,** Email-mahametronews.pune@gmail.com **या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO RNI N0.MAHMAR2022/87390, This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# "सावित्री कलियुगातली" – २६ डिसेंबर २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित

**पुणे :** मराठी चित्रपटसृष्टीचे एक वेगळेच वैशिष्ट्य म्हणजे परंपरा जपत, जुन्या-नव्या विचारांची सांगड घालत मनोरंजनासोबत सामाजिक संदेश देणारे चित्रपट निर्माण करणे. याच परंपरेत भर घालणारा, नात्यांचा अर्थ उलगडणारा आणि स्त्रीशक्तीचे दर्शन घडवणारा "सावित्री कलियुगातली" हा मराठी चित्रपट येत्या २६ डिसेंबर २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

महाराष्ट्रात वटसावित्रीचा सण श्रद्धेने साजरा केला जातो. सत्यवानाचे प्राण यमाकडून परत मिळवणाऱ्या सावित्रीची कथा सर्वश्रुत आहे. याच कथेनुसार पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि जन्मोजन्मी हाच पती मिळावा या भावनेतून महिला वटसावित्रीचे व्रत करतात. मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे, आधुनिकतेच्या झपाट्यामुळे आणि व्यस्त दिनक्रमामुळे हे व्रत आज कमी प्रमाणात दिसून येते.

खरं तर सण-व्रत हे केवळ विधी नसून त्यामागील खरा हेतू म्हणजे पती-पत्नीमधील नाते दृढ होणे, प्रेम, समजूतदारपणा, मैत्री आणि जिव्हाळा टिकून राहणे. आजच्या काळात घटस्फोटांचे वाढते प्रमाण पाहता ही मूल्ये कुठेतरी हरवत चालली आहेत. तरीही कलियुगातही अशा अनेक "सावित्री" आहेत, ज्या आपल्या पतीच्या संकटसमयी खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभ्या राहतात. याच वास्तवाचे प्रभावी चित्रण "सावित्री कलियुगातली" या




चित्रपटातून करण्यात आले आहे.

या चित्रपटात पत्नी-पतीच्या नात्याबरोबरच आई-वडील-मुलगा या नात्यांचेही सूक्ष्म चित्रण पाहायला मिळते. वडिलांची शिस्त झुगारून आईच्या लाडामुळे बिघडत जाणारा मुलगा, संकटात सापडल्यानंतर आईने त्याच्यासाठी केलेली पूजा-तपश्चर्या आणि एकीकडे पत्नी तर दुसरीकडे आई – या दोन्ही नात्यांमधील भावनिक संघर्ष आणि जिव्हाळा हा चित्रपट प्रभावीपणे मांडतो. त्यामुळे हा सिनेमा विशेषतः महिला प्रेक्षकांना नक्कीच भावेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

चित्रपटाची सर्जनशील टीम : सावित्री कलियुगातली या चित्रपटाचे *निर्माते, कथा, पटकथा व दिग्दर्शन* – प्यारेलाल शर्मा, सहनिर्माते – नानासाहेब बच्छाव आणि रविकुमार गजभिये, कलाकार : नायक – पवन चौरे (पुणे), नायिका-मेहेक शेख (मुंबई), मुख्य भूमिका – श्वेता भामरे, निशांत पवार (नाशिक), खलनायक – जयराज नायर, नानासाहेब बच्छाव, इतर कलाकार – राकेश शिर्के, जी. एस. पाटील, रविकुमार गजभिये, विधी, संतोष, पंकज पंडित, सुजाता पवार

बालकलाकार* – नमो गजभिये, तांत्रिक बाजू :संवाद लेखन – राकेश शिर्के, सुजाता पवार, संगीत – दर्शन कहार, तुहीन विश्वास, गीतकार – सुजाता पवार, अनिल अहिरे, छायाचित्रण (DOP) – गणेश पवार, पंकज, सहदिग्दर्शन – राकेश शिर्के, सुजाता पवार, कार्यकारी निर्माता (EP) – पोपट कांबळे, या चित्रपटाचे चित्रीकरण *नाशिक, उरण आणि बदलापूर येथे करण्यात आले आहे.

चित्रपटाची कथा प्रभावी आणि सामाजिक आशयाने भरलेली असल्याने प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या चित्रपटाला शुभेच्छा देताना *वनमंत्री आदरणीय गणेशजी नाईक यांनी, "सावित्री कलियुगातली" हा सिनेमा प्रत्येकाने पाहावा, असे आवाहन करत निर्मात्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.


नात्यांची ताकद, स्त्रीची भूमिका आणि आधुनिक काळातील सावित्रीचा संघर्ष अनुभवण्यासाठी २६ डिसेंबर २०२५ पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात "सावित्री कलियुगातली"

# भगवान ऋषभदेवांचे विचार भारताच्या प्राचीन व महान संस्कृतीचे प्रतीक - फडणवीस

**मुंबई, दि. १९ :** ज्ञान, साधना, सुरक्षा आणि कृषी याबाबत महत्वपूर्ण विचारांदवारे साहित्य, कला, संस्कृती आणि सभ्यता प्रगल्भ करणारा "असी, मसी और कृषी" चा जीवनमार्ग भगवान वृषभदेव यांनी दाखविला. जगाच्या कल्याणासाठी हे विचार व ज्ञान येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश असून भारताच्या प्राचीन व महान संस्कृतीचे प्रतीक म्हणजे ऋषभदेवांचे विचार आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बोरिवली येथे ऋषभायन - २ या तीन दिवसीय वैश्विक सांस्कृतिक आणि वैदिक ज्ञान महोत्सव प्रसंगी बोलत होते. यावेळी राज्याचे कौशल्य विकास, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा,आमदार संजय उपाध्याय, आमदार मनीषा चौधरी, माजी खासदार गोपाळ शेट्टी, एल.पी. सिंह, श्री ललित गांधी तसेच जैन मुनी, शिख, बौध्द आणि हिंदू धर्मगुरू देखील यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिले तीर्थंकर, पहिले सम्राट, भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे प्रतिक भगवान ऋषभदेव आहेत.



जगाला 'संस्कृती' या संकल्पनेची ओळखही नसताना भारत पूर्ण विकसित सांस्कृतिक अवस्थेत होता, भगवान ऋषभदेव यांनी देशाच्या संस्कृतीसाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. मानवजातीला जीवनाचा मार्ग, साहित्य, कला, संस्कृती, अध्यात्म, ज्ञान, शेती, सुरक्षा, प्रेम, आनंद आणि अनंततेची संकल्पना दिली. ऋषभदेव केवळ एका धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर त्यांनी मानवी संस्कृतीचा पाया रचला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भगवान ऋषभदेवांनी पुरुषांसाठी ७२ कला आणि महिलांसाठी ६४ कलांचे विवेचन केले असून, वास्तुकला, धातुकाम, उत्पादन असे ते होते. वैविध्यपूर्ण जीवनपद्धतींचे त्या कलांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमातून घडत आहे.

# मनरेगा या जनहितकारी योजनच्या तरतुदींमध्ये अत्यंत चूकीचे बदल केल्याच्या निषेधार्थ निषेध आंदोलन

**पुणे दि. २०:** काँग्रेस प्रणित केंद्र शासनाने आपल्या कार्यकाळात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही जनहितकारी योजना निश्चित केली होती. मात्र भाजप प्रणित केंद्र शासन हे महात्मा गांधींचे नाव या योजनेतून वगळण्याचे काम करीत आहे. तसेच या योजनेमधील अनेक हितकारी तरतुदींमध्ये बदल करण्याचे ठरविले आहे, हे अत्यंत निंदनीय आहे याच्या निषेधार्थ आज पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, ''राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही योजना सुरू होती. सामाजिक न्याय आणि श्रमाला प्रतिष्ठा देण्याचे कार्य महात्मा गांधींनी केलेले आहे. महात्मा गांधींजीच्या नावे सुरू केली गेलेली मनरेगा ही योजना व त्यातील हितकारी तरतुदी बदलेल्या कदापीही आम्ही सहन करून घेणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा यांना गांधी नावाची अलर्जी झाली आहे. झोपेत सुध्दा त्यांना गांधीच दिसतात. त्यांना वाटते गांधींचे नाव बदलले तर भाजपाला वाटणारी भीती कमी होईल. परंतु महात्मा गांधींचे विचार हे सर्व विश्वाने स्विकारले आहेत. सत्तर काय सातशे वर्षे सुध्दा गांधी-नेहरू यांचे विचार व कार्य कोणीही पुसू शकणार नाही. एकीकडे महात्मा गांधीचे अहिंसेचे विचार संपवून शांती सारखा नवा कायदा अमंलात आणून देशाची सुरक्षितता व्यापाऱ्यांना विकण्याचा कारभार भाजप सत्तेत बसून करीत आहे. १९४८ साली महात्मा गांधींचा खून करून त्यांना संपविण्याचा कट पूर्णत्वाला गेला असला तरी २०२५ मध्ये त्यांचे विचार संपविण्याचा रचलेला कट यशस्वी होऊ देणार नाही.

यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष माजी आमदार रमेश बागवे व खजिनदार ॲड. अभय छाजेड यांनी ही आपली प्रखर मते व्यक्त केली.




यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या समवेत म.प्र.काँ.चे वरिष्ठ उपाध्यक्ष माजी आमदार रमेश बागवे, खजिनदार ॲड. अभय छाजेड, अजित देरेकर, लता राजगुरू, सुनिल शिंदे, प्राची दुधाने, सिमा सावंत, सुजित यादव, हेमंत राजभोज, रमेश सोनकांबळे, रमेश सकट, रवि आरडे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, ॲड. राजश्री अडसूळ, ज्योती चंदवेळ, अनिता धिमधिमे, ज्योत परदेशी अनुसया गायकवाड, माया डुरे, संगीता क्षिरसागर, तारा शर्मा, आस्मा खान, संगीता पवार, प्रमोद निनारिया, राकेश नामेकर, नेर शेख, देवीदास लोणकर, सुरेश नागरे, अविनाश अडसुळ, प्रकाश पवार, अकबर शेख, अरूण वाघमारे, सचिन भोसले, मतीन शेख, अक्षय जैन, सुरेश चौधरी, भगवान कडू आदीसह असंख्य काँग्रेसजण उपस्थित होते.

# महावितरण वीज कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार- संचालक श्री. राजेंद्र पवार

## अत्याधुनिक सुरक्षा साधनांचे वीज कर्मचाऱ्यांसह संघटनांसमोर प्रात्यक्षिक

**पुणे दि. २०:** वीज कर्मचारी हा महावितरणचा आधारस्तंभ आहे. तो सुरक्षित असेल तरच अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांच्या जिविताची सुरक्षा सर्वाधिक प्राधान्याचे आहे. व त्यासाठी महावितरण कंपनी अत्याधुनिक सुरक्षा साधने खरेदी करणार असल्याचे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी पुणे येथे केले.

महावितरणच्या सांघिक कार्यालयातर्फे पुणे परिमंडल येथे १८ व १९ डिसेंबरला अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी कंपनीत कार्यरत असलेल्या प्रमुख औद्योगिक संघटनांच्या शिखर पदाधिकारी, व्यवस्थापनातील वरिष्ठ अभियंते व अधिकारी यांच्यापुढे रास्तापेठ उपकेंद्रात तर दुसऱ्या दिवशी (दि.१९) पद्मावती येथील २२/११ केव्ही उपकेंद्रात परिमंडलातील अभियंते व वीज कर्मचाऱ्यांपुढे सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. सुनिल काकडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड यांचेसह वरिष्ठ अधिकारी व वीज कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



याप्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार म्हणाले, ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करणे हे महावितरणचे कर्तव्य आहे. वीजपुरवठा अखंडित देण्यासाठी यापुढे बिघाड होणार नाहीत, झाल्यास त्याचा कालावधी कमीत कमी असेल, यावर काम करावे लागेल. बाजारात संभाव्य बिघाड ओळखण्याचे नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र बाजारातील अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधन सामुग्री आपल्या यंत्रणेला पुरक आहे का? तसेच त्यात काय बदल करावे लागतील याची माहिती देण्यासाठी या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर व साधनांच्या उपयोगितेवरच ही साधने खरेदी केली जातील अशी ग्वाही त्यांनी दिली.

पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे म्हणाले, 'आपण बाजारातून एखादी वस्तू खरेदी करताना वेगवेगळ्या कसोट्या लावून वस्तूची निवड करतो. त्याप्रमाणे प्रत्येकाने सुरक्षा साधनांची उपयोगिता तपासून आपले प्रामाणिक मत नोंदवावे. कारण, ही साधने आपला जीव वाचविणारी आहेत. वापरकर्त्यांची खात्री पटल्याशिवाय व्यवस्थापन पुढे जाणार नाही.' तर आभार प्रदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. सुनिल काकडे म्हणाले, अपघात हा क्षणाचा असतो. परंतु, त्यामुळे कुटुंबाची घडी विस्कटते. कायमचे अपंगत्व येते. वीज कर्मचाऱ्यांनी सुरक्षेत तडजोड करु नये.'

सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकासाठी मे. तौरस पावरट्रॉनिक्स प्रा.लि.चे तर्फे अनुज अग्रवाल व त्यांच्या चमुने वीज पुरवठा चालू असताना बिघाड शोधण्यासाठी लागणाऱ्या विविध आधुनिक साधनांसह, फोल्डिंग शिडी, बहुउद्देशी रॉड आदींचे सादरीकरण केले. मे. टाटा कंपनीने २२ केव्ही पर्यंतचा वीज रोधक गम बूट सादर केला. याशिवाय महावितरणमधील गणेश वडते व मुबारक पठाण यांनी स्वत: विकसित केलेल्या 'डिस्चार्ज रॉड'चे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी विशेष पुढाकार घेतला.

# लोकशाहीच्या संवर्धनासाठी छोट्या कोपरासभा आवश्यक, त्यांना शुल्क लावणे अयोग्यच

**पुणे दि. २०:** पुण्यामध्ये महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने सर्वच राजकीय पक्ष आणि उमेदवार हे सभा कोपरासभा रॅली काढत असतात.

अनेक अपक्ष उमेदवार तसेच राजकीय पक्षांचे उमेदवार हे पदयात्रेदरम्यान अनेक कोपरा सभा घेतात आणि या सभा घेताना कुठल्याही वाहतुकीस व पादचाऱ्यांना अडथळा न आणता या सभा घेतल्या जातात. त्याचे मुख्यत्वे स्वरूप मतदारांशी संवाद असे असते. दुसरीकडे आर्थिक ताकद मोठी असणारे पक्ष व उमेदवार हे मोठ्या सभा घेताना दिसतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर ती स्टेज स्पीकर खुर्च्या आदी खर्चही केला जातो परंतु त्याच वेळेस ज्यांची आर्थिक क्षमता नाही असे अनेक उमेदवार या छोट्या कोपरासभांच्या माध्यमातून स्वत:चा प्रचार करत असतात. खरे तर लोकशाहीच्या संवर्धनासाठी या

> निवडणूक प्रचारादरम्यान पैशाचा प्रभाव कमी करण्यासाठी विविध नियमावली करणे गरजेचे असताना उलट श्रीमंत आणि गरीब उमेदवार असा भेदभाव करून प्रचाराच्या संधी कमी करणारी ही शुल्काची पद्धत अयोग्य आहे.
>
> - मुकुंद किर्दत, आम आदमी पार्टी, राज्य प्रवक्ता

छोट्या मीटिंग संवाद सभा आवश्यक आहेत आणि त्यामुळे त्यावरती खर्च लागणे अयोग्य ठरेल.

ज्या कोपरासभांना पंधरा-वीस माणसे उपस्थित असतात तर कधी 50, 100 स्थानिक रहिवासी उपस्थित असतात अशा सभांच्या बाबतीत साडेसात हजार रुपये खर्च करणे हे अशक्य आहे. तसेच चौक सभांसाठी 18000 खर्च हा ही अवाजवी आहे.

कोपरा सभांच्या स्वरूपाबद्दल स्पष्टता नसते. त्या अगदी पंधरा-वीस लोकांपासून 400, 500 लोकांपर्यंत होऊ शकतात. त्यामुळे त्याबाबतीत खर्चाची बंधने लाभल्यास त्याचा सर्वात मोठा फटका आर्थिक क्षमता नसणाऱ्या उमेदवारांना होईल आणि यामुळे श्रीमंत उमेदवारांना महापालिका झुकते माप देते असा अर्थ यातून निघेल.

त्यामुळे या पद्धतीच्या कोपरा सभा आणि सभांविषयी खर्च हा केवळ त्या भागाची साफसफाईची जबाबदारी टाळणाऱ्या उमेदवारांनाच लागू करावा. इतरांना यातून सूट द्यावी.

# चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**मुंबई, दि.20 :** पॅरिस येथील युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतिहासात प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोमध्ये स्थापित करण्यात आल्याने या घटनेला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जगभरातील नागरिकांना डॉ. आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाची तसेच शिक्षण, मानवाधिकार आणि सामाजिक समतेच्या मूल्यांची ओळख करून देणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे युनेस्को, पॅरिस येथील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांनी सांगितले.

राजदूत विशाल शर्मा यांनी दादर येथील चैत्यभूमीला भेट देऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते. राजदूत विशाल शर्मा म्हणाले, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त पुढाकारातून साकार झालेल्या या निर्णयामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतिहासात प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोमध्ये स्थापित झाला आहे. शिक्षणालाच प्रगतीचे मुख्य साधन मानणाऱ्या डॉ. आंबेडकर यांचे जीवन आजच्या युवकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माझ्यासाठी बालपणापासून आदर्श आहेत. शिक्षणाच्या जोरावर यश मिळवण्याचा मार्ग बाबासाहेबांनी दाखवला असून, जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन शिक्षण घेण्याची प्रेरणा त्यांनी समाजाला दिली. बाबासाहेबांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी युवकांना केले.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राजदूत विशाल शर्मा म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोला भेट स्वरूपात देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाच्या सहकार्यामुळे शक्य झाले.

# पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६



पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी नवल किशोर राम, महापालिका आयुक्त यांनी निवडणूक विषयक कामकाजाच्या अनुषंगाने पोलीस विभागाकडील आवश्यक कार्यवाहीच्या अनुषंगाने समन्वय साधण्याकरिता बैठक घेतली. सदर बैठकीस रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, संदीप भाजीभाकरे, पोलीस उपआयुक्त विशेष शाखा, अर्चना गायकवाड पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी, तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये निवडणूक कार्यक्रम कालावधी ची माहिती देऊन निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार पोलीस विभागाशी संबंधित विविध कक्ष स्थापन करणे, तसेच विविध कक्षांमध्ये पोलीस विभागाचे समन्वय अधिकारी नेमणे याबाबतची माहिती देण्यात आली. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणी करता व्हिडिओ सर्वेलन्स पथक, भरारी पथक, स्टॅटिक सर्वेलन्स टीम, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, झोनल अधिकारी, निवडणूक निरीक्षक, ईव्हीएम स्ट्रॉंग रूम, साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र, मतमोजणी केंद्र, एक खिडकी योजना तसेच ईव्हीएम यंत्रांच्या वाहतुकी करिता आवश्यक सुरक्षा व्यवस्था, संवेदनशील मतदान केंद्र निश्चिती करणे या अनुषंगिक निवडणूक विषयक कार्यवाही पोलीस विभागाकडून होणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांच्या प्रचाराकरिता सर्व प्रकारच्या जाहीर सभा, तात्पुरते प्रचार कार्यालय, ध्वनिक्षेपक परवानगी, मिरवणूक / रोडशो, प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणन याबाबतची कार्यवाही देखील पोलीस विभागामार्फत करण्यात येते. यावर रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त यांनी निवडणूक पारदर्शकपणे व सुरळीतपणे पार पाडण्याकरिता आवश्यक ते नियोजन करण्यात आले असल्याचे तसेच निवडणूक कामी पुणे महानगरपालिकेस संपूर्ण सहकार्य देण्यात येणार असल्याचे सांगितले.

तदनंतर राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचे समवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीच्या सुरुवातीस राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना सार्वत्रिक निवडणूक, २०२५-२०२६ च्या अनुषंगाने प्राथमिक माहितीचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर उप आयुक्त तथा नोडल अधिकारी, थकबाकी ना हरकत प्रमाणपत्र यांनी थकबाकी ना हरकत प्रमाणपत्राबाबत तयार करण्यात आलेल्या online प्रणालीची माहिती दिली. त्यावर थकबाकी ना हरकत प्रमाणपत्राबाबत तयार केलेली सदर online प्रणाली सुलभ असल्याचे तसेच यामध्ये नाव नोंदणी व अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया अतिशय सहज व सोपी झाली असल्याचे नमूद करून उपस्थित राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांनी पुणे मनपाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे स्वागत केले.

बैठकीमध्ये उपस्थित प्रतिनिधी यांनी शपथ पत्राचा नमुना, थकबाकी ना हरकत प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, पोलिसांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, नावात दुरुस्ती, इत्यादीबाबत प्रश्न मांडले. सदर प्रश्नांचे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) तथा निवडणूक अधिकारी व इतर मनपा अधिकारी यांनी निराकरण केले. तसेच, प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निराकरण करणेबाबत सर्व संबंधित निवडणूक अधिकारी यांना सूचित केले.

## संक्षिप्त

**संत गाडगेबाबा हे थोर समाजसुधारक - अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे**

**पिंपरी :-** "गोपाला गोपाला, देवकी नंदन गोपाला" यासारख्या अनेक भजन किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाद्वारे अज्ञान दूर करुन अंधश्रद्धा आणि अस्वच्छता निर्मूलनासाठी अथांग कार्य करणारे संत गाडगेबाबा हे थोर समाजसुधारक होते असे प्रतिपादन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास कार्यकारी अभियंता महेश कावळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रभाग दोन राष्ट्रवादी व भाजपाचा लागणार कस
# प्रभाग धर्मनिरपेक्ष ; मतदारांची कसोटी

**येरवडा, दि. २०:** फुलेनगर -नागपूरचाळ हा प्रभाग पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहे. पण येथील समिकरण स्थानिक उमेदवारावर अवलंबून असते. त्यामुळे धर्मनिरपेक्ष ही विचारसरणी येथे लागू होऊ शकत नाही. पण यावेळी ही विचारसरणी लागू होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे लोकसभेप्रमाणे महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण असले तरी भारतीय जनता पक्षाची समीकरणे सत्ता काबीज करण्याकडे अधिक आहे .

फुलेनगर नागपूर चाळ प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार सुनील टिंगरे यांचे बंधू सुहास टिंगरे आणि भाजपाचे माजी नगरसेवक अनिल टिंगरे यांचे बंधू विशाल टिंगरे निवडणुकीच्या रिंगणात प्रथमच उतरणार आहेत. सुहास टिंगरे आणि विशाल टिंगरे यांना विजयी करण्यासाठी त्यांचे मोठे बंधू पूर्ण ताकद पणाला लावतील. याशिवाय माजी नगरसेविका शीतल सावंत,माजी उपमहापौर डॉ.सिद्धार्थ धेंडे यांच्या पत्नी आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते मंगेश गोळे हेही निवडणूक लढवत आहेत.त्यामुळे पन्नास टक्के पेक्षा अधिक संमिश्र झोपडपट्टी असणारा मतदार राजा कोणाच्या बाजूने उभा राहणार आणि कोणाला निवडून देणार ,याकडे संपूर्ण प्रभागाचे लक्ष लागले आहे.सिद्धार्थ धेंडे यांनी अद्याप कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढणार आहे,हे गुलदस्त्यात ठेवले आहे.

२०१७ साली झालेल्या पालिका निवडणुकीत प्रभाग दोन मधून भारतीय जनता पक्ष रिपब्लिकन पक्षाचे सिद्धार्थ धेंडे, फरजाना शेख,शीतल सावंत आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील टिंगरे विजयी झाले होते.यंदाच्या निवडणूक आरक्षणात अनुसूचित जाती ची जागा महिलेला गेली आहे. त्यामुळे माजी नगरसेवक आणि माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकत नाही.त्यामुळे धेंडे यांनी त्यांच्या पत्नी नंदिनी यांना बाहेर काढले आहे.

**एकूण मतदार : ७८,६२६**
**अ अनुसूचित जाती (महिला)**
**ब ओबीसी पुरुष**
**क सर्वसाधारण (महिला)**
**ड सर्वसाधारण ( पुरुष)**

**प्रभागाचा लेखा- जोखा**
**प्रभाग : दोन ( नागपूर चाळ -फुलेनगर)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक सुनील टिंगरे हे २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत विजयी झाले होते.त्यामुळे प्रभाग दोन मधून सुनील टिंगरे यांनी आपले लहान बंधू सुहास टिंगरे यांना निवडणुकीत उतरविले आहे. भाजपा मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आलेल्या माजी नगरसेविका शीतल सावंत आता राष्ट्रवादी कडून निवडणूक लढवत आहे.

दुसरीकडे भाजपाकडून प्रभाग एकचे माजी नगरसेवक अनिल टिंगरे यांचे लहान बंधू सुहास टिंगरे यांना प्रभाग दोन मधून तयारी सुरू केली आहे.याशिवाय भाजपकडून ज्येष्ठ नेते मंगेश गोळे यांच्यासह भाजपा कडून मंगेश गोळे,सुभाष चव्हाण, राहुल जाधव,सुधीर वाघमोडे, नितीन कुचेकर निवडणूक लढवत आहे.

पालिका निवडणुकीत दोन वेळा विजयी झालेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील गोगले यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ( उबाठा) पक्षात प्रवेश करून आघाडीकडून निवडणूक लढणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून ॲड नानासाहेब नलावडे अजहर शेख रिंगणात आहेत.

येत्या काही दिवसांत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत मिळत आहे.आघाडी होणार की शिवसेना मनसे सोबत युती करणार ,यावर राजकीय समीकरणे बदलू शकतात.त्यांनतर प्रभागातील चित्र आणखीन बदलू शकते.याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले आहे.त्यामुळे मागील निवडणुकीत भाजपाचे तीन नगरसेवक निवडून देणार मतदार यंदा कोणाच्या पारड्यात मतदान करणार हे पाहणे औत्सुक्याचे असणार आहे.

भाजपकडून नंदिनी धेंडे, सचिन धिवार आदिती बाबर,रूपाली चव्हाण,शामा जाधव,बाफना इच्छुक आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून यशा बल्लाळ,आरती दिनेश पाटील ,अपेक्षा कांबळे ,प्रिया भोंडे, शीतल सावंत,प्राची पाटील, सुहास टिंगरे,महेश पाटील इच्छुक आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून वर्षा जाधव, नंदा कांबळे, मोनिका गायकवाड, नानासाहेब नलावडे, अजहर खान आणि आरपीआय ऐश्वर्या पवार इच्छुक आहेत.

# डाळिंबाचा पहिला कंटेनर समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना

**मुंबई, दि. 20 :** महाराष्ट्रात उत्पादित डाळिंबाचा हंगामातील पहिला कंटेनर मुंबईतील जेएनपीटी बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना करण्यात आला आहे. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरून हा कंटेनर रवाना करण्यात आला असून राज्यातील फळनिर्यातीच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

अमेरिका - भारत कृषी-निर्यातविषयक घडणाऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये उच्चस्तरीय चर्चा सुरू आहेत. अशा परिस्थितीत डाळिंबाचा पहिला कंटेनर रवाना होणे हे भारताची विश्वासार्हता, गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगततेचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.

**जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील**

पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील उत्पादित होणाऱ्या फळे, भाजीपाला आणि इतर शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आंबे, डाळिंब इतर फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळावे, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ आणि केंद्र शासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेसाठी जेएनपीटी बंदरातून हंगामातील पहिला डाळिंब कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात क्षमतेसाठी तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार आहेत.



भारतीय डाळिंबांचा अमेरिकन बाजारपेठेतील वाटा वाढल्यास राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न 20 ते 30 टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचेही पणन मंत्री रावल यांनी नमूद केले. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा, एनपीपीओ व निर्यातदार अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सातत्याने तांत्रिक व धोरणात्मक पातळीवर कार्यरत आहेत.

**डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार**

2017-18 मध्ये काही तांत्रिक कारणामुळे अमेरिकेला भारतातून डाळिंब निर्यात बंद झाली होती. परिणामी जवळपास सहा वर्षे भारतीय डाळिंब अमेरिकन बाजारपेठेत पोहोचू शकला नव्हता. निर्यात पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाच्या अपेडा व राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी (यू.एस.डी.ए.) तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर सातत्याने चर्चा करून कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावर आवश्यक चाचण्या घेऊन अहवाल सादर केले. पॅक-हाऊसमध्ये डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आली. त्यानंतर यू.एस.डी.ए. व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणीनंतर विकिरण प्रक्रिया पार पाडण्यात आली. 4,800 बॉक्सेसमधून 17,616 किलो (सुमारे 17.6 मेट्रिक टन) डाळिंब निर्यात करण्यात आली आहे.

सन 2024 मध्ये अमेरिकेने निर्यातीसाठी काही शास्त्रीय निकष लागू केले आहेत. यामध्ये माईट वॉश प्रोटोकॉल, सोडियम हायपोक्लोराईडद्वारे निर्जंतुकीकरण तसेच वॉशिंग व ड्रायिंग प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच डाळिंबाचे चार किलो क्षमतेच्या प्रमाणित बॉक्समध्ये पॅकेजिंग करून अधिकृत विकिरण सुविधा केंद्रात विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे. या सर्व प्रक्रिया यूएसडीए व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणी व मान्यतेनंतरच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या प्रसंगी यूएसडीए निरीक्षक रॉबर्टो रिवाझ, एनपीपीओचे डॉ. बी.एल. मिना, कृषी पणन मंडळाचे विभाग प्रमुख अनिमेष पाटील, अपेडाचे बामणे तसेच संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**300 मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन**

कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी यावेळी चालू 2025-26 हंगामात अमेरिकेस सुमारे 300 मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली. अमेरिकेतील बाजारपेठेत डाळिंबाची मागणी झपाट्याने वाढत असून, तेथील डाळिंब बाजारपेठ सध्या अंदाजे 1.2 ते 1.5 अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे. विशेषतः भारतीय 'भगवा' व 'सुपर भगवा' जातींना चव, रंग व साखर-आम्ल संतुलनामुळे अधिक मागणी आहे.

# राष्ट्रीय कला उत्सवाला जल्लोषात सुरुवात

**पुणे दि. २०:** भारत सरकारचे शिक्षण मंत्रालय आणि महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित अकराव्या राष्ट्रीय कला उत्सवाचा उद्घाटन सोहळा यशदा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. यावेळी केंद्रीय शिक्षा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. आनंदराव पाटील, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. रनजीत सिंह देओल, शिक्षण आयुक्त श्री. सचिन्द्र प्रताप सिंह, एनसीईआरटीचे संचालक दिनेश प्रसाद सकलानी, एससीईआरटीचे संचालक श्री. राहूल रेखावार, एनसीईआरटीच्या विभाग प्रमुख प्रा. ज्योत्स्ना तिवारी व शिक्षण विभागातील मान्यवर अधिकारी उपस्थित होते. एनसीईआरटी, नवी दिल्लीद्वारे या उत्सवाचे २०१५ पासून दरवर्षी आयोजन केले जाते.



यावेळी बोलताना केंद्रीय शिक्षा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. आनंदराव पाटील, म्हणाले की, भारतीय कला व संस्कृती वैविध्यपूर्ण आणि सुंदर असल्यामुळेच आपला देश देखील खूप प्रगल्भ आहे. विद्यार्थ्यांनो तुम्ही विकसित भारताचे स्वप्न साकार करणार आहात. या विकसित भारताच्या स्वप्नात कला क्षेत्राची भूमिका फार महत्वाची असणार आहे. २०२५ मध्ये या उत्सवाचे दोन अध्याय पार पडले. जानेवारी २०२५ ला भोपाळमध्ये आणि आता पुण्यामध्ये म्हणून हा उत्सव खास होणार आहे. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी बालवयात याच भूमीतून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा निर्धार केला होता. याच भूमीमध्ये आज तुम्ही देशभरातून सर्व विद्यार्थी कला उत्सवासाठी दाखल झाला आहात ही खूप प्रेरणादायी बाब आहे.

देशभरातून येथे विद्यार्थी कला सादर करण्यासाठी आलेले आहेत. त्यामुळे भारतभराचे कलाविश्व याठिकाणी अवतरल्यासारखे वाटत आहे. स्पर्धा कशीही होवो परंतु येथून प्रत्येक विद्यार्थी कलेची देवाणघेवाण करून जाणार जाणार असल्याची भावना शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री.रनजीत सिंह देओल यांनी व्यक्त केली.

हा कला उत्सव सर्व विद्यार्थ्यांसाठो अविस्मरणीय होणार आहे. कोणत्याही खेळात, कलेत सहभाग घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मेहनत करा आणि यशस्वी व्हा. असा मूलमंत्र शिक्षण आयुक्त श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांनी विद्यार्थ्यांना दिला. तर कला राष्ट्राला राष्ट्रांशी जोडते आणि संस्कारित जीवन जगण्यासाठी प्रत्येकाला प्रेरित करते. कला ही भारताच्या कणाकणात वसलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील कलेला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. सुसंस्कृत आणि आदर्श नागरिक निर्माण करण्यासाठी हा कला उत्सव मोलाची भूमिका पार पाडणार असल्याचे मत एनसीईआरटीचे संचालक दिनेश प्रसाद संकलानी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रातील पुणे हे शहर शैक्षनिक,कला आणि भक्तीचे वारसदार आहे. त्यामुळे या ठिकाणी हा कलाउत्सव पार पडतोय याचा मला आनंद होतोय अस म्हणत यंदाचा हा अकरावा कलाउत्सव खूप खास होणार असल्याचे एनसीईआरटीच्या विभाग प्रमुख, प्रा. ज्योत्स्ना तिवारी यांनी सांगितले. गेल्या दहा वर्षात या उत्सवामध्ये एकूण विविध राज्यातील ७३१८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. यंदाच्या या अकराव्या कला उत्सवासाठी आसाम लक्षद्वीप अशा देशभराच्या कानाकोपऱ्यातून ८०० हून अधिक विद्यार्थी पुण्यात दाखल झाल्याचे देखील त्यांनी यावेळी नमूद केले.

या उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय कला उत्सवाच्या दहा वर्षाच्या वाटचालीची चित्रफित (शॉर्ट फिल्म) देखील दाखवण्यात आली. यामध्ये दहा वर्षांमध्ये कार्यक्रमात होत गेलेले बदल आणि नव्याने जोडल्या गेलेल्या कलांची माहिती देण्यात आली.

उद्घाटनानंतर प्रतिभा ज्युनियर कॉलेज पिंपरी यांचे महाराष्ट्राची कलासंस्कृती दर्शवणारे दमदार नृत्य सादरीकरण झाले आणि या उत्सवाला सुरुवात झाली . या उद्घाटन सोहळ्याचे प्रक्षेपण विशेष विद्यार्थ्यांना देखील पाहता यावे यासाठी तेजल पटवारी आणि श्रुती अवाले यांनी सांकेतिक भाषेद्वारे (साईन लँग्वेज) इंटरप्रिटेशन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधू जयस्वाल आणि विकास कोकाटे यांनी केले तर एससीईआरटीचे संचालक श्री. राहूल रेखावार यांनी आभार मानले.

यंदाचा हा कला उत्सव महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या समन्वयाने तसेच श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी यांच्या सहकार्याने दि. २० ते २३ डिसेंबर २०२५ या कालावधीत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे येथे संपन्न होत आहे. यासोबतच भारत सरकारचे २०० शैक्षणिक चॅनल आहेत. त्यातील इ विद्या चॅनल नंबर ३३ वर या कला उत्सवाचे लाईव्ह प्रक्षेपण सुरू असणार आहे.

# मतमोजणी प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी

पुणे, दि.२० : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे जिल्ह्यात १२ नगरपरिषदा व ३ नगरपंचायतीकरिता २ आणि २० डिसेंबर २०२५ रोजी मतदानप्रक्रिया पार पडली; या निवडणुकीकरिता २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होणार आहे, याकरीता जिल्हा प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

या मतमोजणीच्या कामकाजाकरिता राखीव कर्मचारी मिळून एकूण ९१४ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. निकालाच्यादिवशी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरिता पर्याप्त व पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात असून त्याअनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून मतमोजणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मतमोजणीच्या अनुषंगाने प्रत्येक मतमोजणी केंद्रावर आवश्यक साहित्य उपलब्ध व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. मतमोजणी केंद्रात प्रवेशाकरिता संबंधित कर्मचारी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी तसेच माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रवेशिकाही देण्यात आलेल्या आहेत. माध्यमांच्या प्रतिनिधींना फेरीनिहाय निकाल तातडीने उपलब्ध करून देण्याकरिता मतमोजणी केंद्रावर स्वतंत्र बैठक व्यवस्था (माध्यम कक्ष) तयार करण्यात आले आहेत.

संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेचा आढावा घेऊन अचूक व सुयोग्य पद्धतीने मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्याकरिता काटेकोर नियोजन व रंगीत तालीम घेण्याबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याचबरोबर सुरक्षा व्यवस्थेचा आढावाही घेण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली आहे.



**लोहगाव :** धानोरी प्रभाग एक लोहगाव, धानोरी नधील नाले बंदिस्त करून त्यावर राडारोडा टाकला आहे. तर महापालिकेने ओपन टू स्काय नाले पुन्हा मोकळे केले आहेत

## पिंपरी चिंचवड महापालिका नियोजित सार्वत्रिक निवडणुकीसाठी
# प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी

पिंपरी, २० डिसेंबर २०२५ : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या निवडणूक विभागाने राज्य निवडणूक आयोगाच्या नियम व तरतुदींचे पालन करून तयार केलेली प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी आज, शनिवार (२० डिसेंबर २०२५) रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर अंतिम मतदान केंद्रांची यादी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www. pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच, नागरिकांच्या सोयीसाठी प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील निवडणूक विभाग, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये तसेच आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरसोय होऊ नये, यासाठी मतदारांनी आपले संबंधित मतदान केंद्र कोणते आहे, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन निवडणूक विभागामार्फत करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखत मतदारांना सुलभ आणि सुरक्षित मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही अंतिम यादी तयार करण्यात आली असल्याचेही निवडणूक विभागातून सांगण्यात आले.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रियेतील पुढील टप्प्यांसाठी सदर अंतिम मतदान केंद्रांची यादी तयार करण्यात आली असून, मतदान प्रक्रियेत सुलभता, पारदर्शकता आणि मतदारांना सोयीची व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही यादी प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.





दैनिक
महा मेट्रो

**बातमीदार पाहिजे**

पुणे शहर, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, खडकवासला, हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट, वडगावशेरी, भोसरी, पिंपरी व चिंचवड साठी बातमीदार पाहिजे.
यासह पुणे व पिंपरी -चिंचवड मध्ये जाहिरात प्रतिनिधी पाहिजे.
संपर्क : 9922930195/ 9970688865
निवडणूकीतील उमेदवारांच्या मुलाखती घेणे, मतदारांच्या प्रतिक्रिया घेणे , कंटेन्ट रायटर ( लेख लिहिणे) , वितरण प्रतिनिधी पाहिजे.
( आकर्षक पगार , प्रवास खर्च मिळेल , दुचाकी असणे आवश्यक)
Email. Mahametronews.pune1@gmail.com यावर आपला बायोडाटा मेल करावा.

